**Ex - Dean**
Faculty of Management &
Professor Emeritus of
Commerce & Management Sciences,
University of Pune.

**Dr. P. C. Shejwalkar**
Director,
Off.: Institute of Management Education
47/16 Erandawane Karve Road, Pune 411004.
Res.: 108/11, Bharati Niwas Colony,
Erandwane, Prabhat Road, Pune 411 004.

Ph. No. (Off.) 25430327, 25449743
Telefax : 020-25460739
E-mail : imepune@vsnl.com
Website : www.asm.ac.in

।। श्री ।।

२४/४/२००७

प्रिय चि. दीपक यांस,
सप्रेम नमस्कार

तुम्ही अगत्यपूर्वक आणि आपुलकीनं पाठविलेलं 'संगणकाची भरारी' हे पुस्तक मिळाल्याबरोबर लगेच वाचायला घेतलं. पुस्तक पाहताक्षणीच एकदम आकर्षक वाटलं. पुस्तकाची निर्मितीमूल्यं, पांढराशुभ्र कागद, उत्तम छपाई आणि पुस्तकाची रचना या सर्व गोष्टींमध्ये तुमची कल्पकता दिसून येते. तुमचं मनोगत हेदेखील लक्षात ठेवण्यासारखं आहे. मात्र तुमचा फोटो सध्या तुम्ही दिसता तसा नाही. तो जुना असावा. पुस्तकातील भाषा साधी, सोपी, आणि ओघवती आहे. माझ्यासारख्या संगणकनिरक्षर असलेल्या वाचकालादेखील या तुमच्या पुस्तकामुळे पुष्कळच नवीन ज्ञान मिळालं. तुमचा संगणक क्षेत्रातील अभ्यास दांडगा आहे आणि या संदर्भात तुम्ही करीत असलेले सामाजिक योगदान हेही लाख मोलाचं आहे. प्रत्येक प्रकरणात बरीच नवीन माहिती मिळते. विशेष म्हणजे पुस्तकात तुम्ही घातलेली औचित्यपूर्ण व्यंगचित्रं हे या पुस्तकाचं वैशिष्टय आहे. शेवटच्या पानावर तर 'सायबर बाळ' हे खूपच आवडलं. तुम्ही प्रथमपासून अनेक वर्षे संगणकाचा व्यापक अभ्यास करण्याचा घेतलेला ध्यास मला अभिमानास्पद वाटतो. हे पुस्तक सर्व वाचकांना आवडेल अशी माझी खात्री आहे.

पुन्हा एकदा या सुरेख पुस्तकाबद्दल तुमचं मनःपूर्वक अभिनंदन.

तुमचा

प्र. चिं. शेजवलकर

(प्र.चिं.शेजवलकर)

माननीय श्री दीपक शिकारपूर
बी–बी/२५, स्वप्नशिल्प,
गांधी लॉन्सशेजारी, गणेशनगर,
कोथरूड, पुणे ४११ ०३८